नि.फौ.ख.क्र.३७१/२०२५
सरकार –वि– शेख अहमद
<u>निशाणी क्रमांक १६</u>

<u>**सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०३ ची साक्ष शपथेवर सुरू**</u> :–

माझे नाव :– दर्शन सुभाषचंद्र धंदुकिया
वय :– ४५ वर्ष, व्यवसाय :– व्यवसाय,
राहणार :– शेगांव, ता.शेगांव, जि. बूलडाणा.

<u>**सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू**</u> :–

१. मी फिर्यादीला ओळखतो. तो माझ्या काकाचा मुलगा आहे. त्यांचे घरी काय घटना घडली मला माहीती नाही. पोलीसांनी मला पंच म्हणुन हजर राहण्यासाठी सुचनापत्र दिले नाही. माझेसमक्ष कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही व पंचनामा करण्यात आला नाही. पोलीसांनी माझी सही घेतली होती. आता मला सुचनापत्र व घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझ्या सहया आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. सहिपुरता अनुक्रमे **नि.क्र.१७ व १८** देण्यात येते. पोलीसांनी माझे बयाण घेतले नाही.

**(सदर साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्त्याच्या तोंडी विनंतीवरुन या साक्षदाराला उलटतपासणी स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवाणगी देण्यात आली.)**

२. हे म्हणने खरे आहे की फिर्यादी माझे घराशेजारी राहतात. हे म्हणने खरे आहे की दिनांक २७.०२.२०२५ ते ०५.०३.२०२५ ते गावाला गेले होते. आता मला माझे बयाणातील अधोरेखांकीत भाग अ वाचुन दाखविला. तो बरोबर नाही. पोलीसांनी तो तसा का लिहीला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणने खरे नाही की दिनांक ०६.०३.२०२५ रोजी पोलीसांनी मला सुचनापत्र दिले होते व त्या अनुषंगाने घटनास्थळी पंच म्हणुन हजर राहण्यासाठी सुचना दिल्या. हे म्हणने खरे नाही की त्या अनुषंगाने मी घटनास्थळी हजर झालो. हे म्हणने खरे नाही की माझ्यासमक्ष फिर्यादीने पोलीसांना घटनास्थळ दाखविले. हे म्हणने खरे नाही की पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला व त्यावर मी वाचुन समजुन सही केली. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणने खरे नाही की मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

<u>**उलटतपास आरोपीतर्फे श्री.मिरगे वकील साहेब यांनी नाकारला.**</u>

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

MADHURI KEWAL GOTE

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ११.०३.२०२६.**

**माझे समक्ष,**

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.03.11 17:07:36 +0530

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ११.०३.२०२६**